तुळजाभवानी मंदिराच्या जमिनीवर ३०० मेगावॉटचा सौरऊर्जा प्रकल्प

नामांकित दहा कंपन्यांचे सादरीकरण

विशेष प्रतिनिधी लोकसत्ता

छत्रपती संभाजीनगर : धाराशिव जिल्ह्यात वर्षातील सर्वाधिक दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध असल्याने तुळजाभवानी मंदिर संस्थानाच्या जागेत ३०० मेगावॉट क्षमतेचा सौरप्रकल्प उभा करण्यात येणार असून, या माध्यमातून १३५० कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, असा दावा तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केला. मंदिर संस्थानकडे जवळपास १५०० एकर जमीन उपलब्ध आहे.

तुळजाभवानी देवीच्या मंदिरात वेगवेगळ्या सेवा रुजू करणाऱ्या मठांच्या शाश्वत उत्पन्नात वाढ करण्याच्या अनुषंगाने मंदिर संस्थानाच्या जागेवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत ठराव संमत करण्यात आला होता. देशभरातील नामांकित कंपन्यांकडून यासाठी प्रस्ताव आले आहेत. शुक्रवारी या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी तुळजाभवानी मंदिर संस्थान, तसेच विविध मठांच्या जमिनीवर कशा पद्धतीने सौरऊर्जा प्रकल्प साकारला जाईल, याचे सादरीकरण केले. केंद्र सरकारच्या अपारंपरिक ऊर्जानिर्मितीच्या धोरणाला प्रतिसाद देत रिलायन्स, जुनीपर, जेएसडब्ल्यू, सॉलीटिस, एनएचपीसी, टीयूव्ही यांसारख्या नामांकित कंपन्यांनी शुक्रवारी मंदिर कार्यालयात आयोजित सादरीकरणात सहभाग नोंदवला. या माध्यमातून तुळजाभवानी मंदिर संस्थान, तसेच विविध मठांना आर्थिक उत्पन्नाचा शाश्वत स्रोत उपलब्ध होईल, असे सांगण्यात येत आहे. सौरऊर्जा प्रकल्पासाठी जागा भाड्याने देणे सयुक्तिक राहील काय, प्रकल्पाच्या उभारणीनंतर एकूण उत्पन्नातील हिस्सा घेणे अथवा प्रकल्पामध्ये अंशतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे काय, आदी महत्त्वपूर्ण बाबींवर बैठकीत चर्चा झाली. यात सल्लागाराची नेमणूक करण्याबाबतही चर्चा झाली असून, त्यानुसार पुढील कामाची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मंदिर संस्थानच्या तहसीलदार श्रीमती माया माने, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्यासह विविध दहा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षणही घेतले जाणार आहे. या प्रकल्पात तब्बल रु. १३५० कोटींची गुंतवणूक व त्यातून ५०० हून अधिक रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. सौर व पवन ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी नियोजन केले आहे. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यविकासाचे अल्प कालावधीचे कोर्स चालू करण्यात येणार असल्याचे राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

स्त्री–पुरुष विषमता ही मानवी जगण्याची काळी बाजू

ज्येष्ठ स्त्रीवादी विचारवंतांशी संवाद कार्यक्रमातील सूर

नांदेड : स्त्री-पुरुष विषमता ही मानवी जगण्याची काळी बाजू असून, पुरुषप्रधान समाजात सत्तेच्या राजकारणात भाषेच्या माध्यमातून होणारी विषमता स्त्रीवाद नाकारतो, असे परखड मत 'मिळून साऱ्या जणी' या मासिकाच्या संपादक आणि पुणे येथील स्त्रीवादी विचारवंत डॉ. गीताली वि.म. यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल आणि डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'मराठी भाषा, संस्कृती आणि स्त्रीवाद' या विषयावर डॉ. योगिनी सातारकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला, त्यावेळी त्या बोलत होत्या. संचालक डॉ. दिलीप चव्हाण हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. योगिनी सातारकर यांनी गीताली वि.म. यांचा परिचय करून देत त्यांनी १९८० च्या दशकात केलेले सुरुवातीचे सामाजिक कार्य, फर्ग्युसन महाविद्यालयातील अध्यापन, निगराणी, नारी समता मंच, शाश्वत, निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असे त्यांचे संस्थात्मक कार्य आणि विशेषतः 'माझ्या पुरुषत्वाचा प्रवास' आणि 'बापलेक नात्याचा कॅलिडोस्कोप' ही गीतालींची पुस्तके या संदर्भाने प्रश्न विचारत त्यांच्याशी संवाद साधला.

स्त्री चळवळीचे स्वरूप हे पुरुष विरोधी आणि केवळ स्त्रियांसाठी असे नाही हे नमूद करत पुरुषप्रधान संस्कृती, जात व धर्म, विषमता आणि संवादाची गरज यावर गीताली यांनी प्रकाश टाकला आणि भारतीय संविधानाला ७५ आणि आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षाला ५० वर्षे पूर्ण झाली असून आपण कालबाह्य विषमतावादी रुढींना तिलांजली द्यायला हवी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

मिळून साऱ्याजणी, पुरुष उवाच आणि पुरुषस्पंदन या त्यांच्या नियतकालिकांच्या संदर्भात आणि एकूणच प्रत्यक्ष जीवनात स्त्री व पुरुषांना येणाऱ्या अनुभवांवर आधारित प्रश्न उपस्थित प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांनी विचारले.

अंबाजोगाईत दुसरे एल्गार मराठी गझल संमेलन

छत्रपती संभाजीनगर : अंबाजोगाईत दुसरे 'अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन' १ व २ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. संमेलनासाठी महाराष्ट्रातून आणि महाराष्ट्राच्या बाहेरून २५० पेक्षा अधिक गझलकार येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष दगडू लोमटे यांनी दिली.

संमेलनस्थळाला 'सुरेश भट गझल नगरी' असे नाव देण्यात येणार आहे. तर प्रवेशद्वाराला 'मराठी शायर भाऊसाहेब पाटणकर' यांचे, व्यासपीठाला 'सतीश दराडे स्मृती मंच' असे नाव दिले जाणार आहे. तसेच ग्रंथ प्रदर्शनाला भगवानराव लोमटे यांचे नाव देण्यात येणार आहे.

योगेश्वरी महाविद्यालयातील नागापूरकर सभागृहात हे संमेलन होणार आहे. या संदर्भातील बैठकीस स्वागत समितीच्या कार्याध्यक्षा डॉ. शुभदा लोहिया, सचिव गोरख शेंद्रे, उपाध्यक्ष निशा चौसाळकर, डॉ. नरेंद्र काळे आदी सदस्य हजर होते.

'स्थानिक' निवडणुकीचे वारे; परभणीत पक्षांतराचा हंगाम

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे वारे जोरात होते. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर समीकरणे बदलली आहेत. विरोधी गटात राहण्याऐवजी सत्ताधारी पक्षात प्रवेश करण्याकडे जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांचा कल असून, अनेक कार्यकर्त्यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीत (अजित पवार) प्रवेश केला आहे.

भविष्यात सत्ताधारी राष्ट्रवादीसह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणाऱ्या कार्यकर्त्यांचे आणखी काही प्रवेश सोहळे होऊ घातले आहेत. जिंतूर तालुक्यात सुरेश नागरे, नानासाहेब राऊत आणि शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. शिर्डीत पार पडलेल्या पक्षाच्या अधिवेशनात या तीनही स्थानिक नेत्यांनी पक्षांतर केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सर्वांनी हा निर्णय घेतला आहे. सुरेश नागरे हे काही काळ काँग्रेस पक्षात कार्यरत होते. तथापि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मिळवली होती.

नानासाहेब राऊत हे दीर्घकाळ माजी आमदार विजय भांबळे यांचे कट्टर समर्थक होते. पण गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांनी आपली स्वतंत्र राजकीय वाटचाल सुरू केली होती. तर साडेगावकर यांनी कोणावरही नाराजी व्यक्त न करता आपला उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेना जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा विधानसभा निवडणुकीदरम्यान दिला होता. जिंतूर तालुक्यात शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा मोठा संच आहे. मात्र, आता या गटातही मोठ्या प्रमाणात अस्वस्थता दिसून येत आहे.

विशेषतः विरोधी पक्षात राहण्याऐवजी सत्ताधारी पक्षात जाऊन आपली कामे करून घ्यावीत, असा दबाव कार्यकर्त्यांकडून स्थानिक नेत्यांवर वाढत आहे. जिंतूर तालुक्यात सत्ताधारी राष्ट्रवादीत अजून काही पक्षप्रवेश होतील, अशी माहिती आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांपैकी काहीजण एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्यास उत्सुक असल्याचेही कळते. येत्या काही दिवसांत ही पक्षांतरे होतील, अशी राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

विन्टर स्पेशल ऑफर *
महाबळेश्वर
The Byke A HOTEL RETREAT EAT GREEN • STAY EVERGREEN
दी बाईक शांती विला
Rs. 9,999/-*
प्रति कपल 2 रात्रीचे पॅकेज
स्टे + नाश्ता + रात्रीचे जेवण
कॅन्डल लाईट डिनर (1 रात्र) । फूड वर 20% डिस्काउंट
दी बाईक साई कॉटेज
Rs. 7,999/-*
प्रति कपल 2 रात्रीचे पॅकेज
स्टे + नाश्ता
फूड वर 20% डिस्काउंट । शेफ चॉईस मेनू
☎ +91 7506 111 720 प्युअर व्हेज रिसॉर्ट्स ☎ +91 7506 111 719
*T & C Apply www.thebyke.com reservation.mahabaleswar@thebyke.com

यात्रासहल

श्रीरामकृष्ण :- चारधाम- त्रियुगीनारायण- ०१-०५-२०२५// १२-०५-२०२५// २३-०५-२०२५// काश्मिर- वैष्णोदेवी- टुलिप गार्डन- ०२-०४-२०२५// १९-०४-२०२५// सिक्कीम- दार्जिलिंग- भुतान- १५-०४-२०२५// ०६-०५-२०२५ उत्तरवाहिनी नर्मदापरिक्रमा- ०१-०४-२०२५// १७-०४-२०२५ लेह लडाख- २५/०४/२०२५// १५-०५-२०२५// नेपाळ- पोखरा- काठमांडू- १८-०४-२०२५// १६-०५-२०२५ शास्त्रोक्त नर्मदापरिक्रमा- ०१-०२-२०२५// रु. १५००/- सवलत ३१-०१-२०२५ पर्यंत// कोकणातील आनंदवन बापट- ९१३७००१३९५/ ९८२००२३१०६.

0070945299-1

पाहिजेत

मुंबई, दिल्ली- घरकाम, जेवण बनविण्यासाठी, मुलांना सांभाळणे, पेशंट केअरसाठी मुली/ महिला पाहिजेत. राहणे- खाणे फ्री, चांगला पगार. 9892396441. (एजेंट सहभागी होऊ शकतात.)

0070945095-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

दुःखद निधन

भावपूर्ण श्रध्दांजली

शुभदा जहागिरदार
(वय ७०)
उत्साही व धडाडीच्या समाजसेविका,
मृत्यू- २१/१२/२०२४,
शुभदाच्या आठवणी/श्रध्दांजली
shubhadaj2024@gmail.com
येथे ईमेल कराव्यात,
प्रार्थना सभा: –
सायंकाळी ५ ते ७,
शनिवार २५/१/२०२५ रोजी,
दामले सभागृह,
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय,
१७२, नायगाव, दादर,
मुंबई– १४. ,
शोकाकुल
सौ. शशी व श्री. जयंत साठे
आणि समस्त मित्र परिवार.

0070946032

केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, केआयएफएस कॉर्पोरेट हाऊस, हॉटेल प्लॅनेट लॅण्डमार्कच्या बाजूला, अशोक वाटिकाजवळ, बीआरटीएस, इस्कॉन-अम्ब्ली रोड, बोडकदेव, अम्ब्ली, अहमदाबाद, गुजरात-३८० ०५४.
कॉर्पोरेट कार्यालय : सी-९०२, लोटस पार्क, ग्राहम फर्थ कम्पाऊण्ड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गोरेगाव (पू), मुंबई-४०० ०६३, महाराष्ट्र, भारत. **फोन न. :** +९१ २२ ६१७९६४००,
ई-मेल : contact@kifshousing.com **वेबसाइट :** www.kifshousing.com
सीआयएन : U65922GJ2015PLC085079 **आरबीआय सीओआर : DOR-00145**

प्रत्यक्ष ताबा सूचना

श्री. अशोक विलास वाघमारे
श्रीमती स्वाती अशोक वाघमारे
पत्ता : फ्लॅट नं. एसी-१३, तिसरा मजला, प्लॉट नं. ४५ ते ४६, गट नं. २२, वृंदा, वन नगरी फत्तेपूर, औरंगाबाद-४३१ ००६, महाराष्ट्र, भारत.

ज्याअर्थी,
केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुमचे लोन अकाऊन्ट नं. **LNHLAUR000061 & LNHEAUR000158** नुसार **सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रु. ९,२९,०५१/- (रुपये नऊ लाख एकोणतीस हजार एकावन्न फक्त) व रु. २,०८,६६५/- (रुपये दोन लाख आठ हजार सहाशे पासष्ट फक्त) असलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता तुमच्यावर फर्माविणारी** दिनांकित **१४ फेब्रुवारी, २०२३ व २० एप्रिल, २०२३** मागणी सूचना निर्गमित केली आहे.
तुम्ही रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात, याद्वारा तुम्हास व तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी आज दिनांक **१६ जानेवारी, २०२५** रोजी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
विशेषकरून तुम्हास आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार त्याकरिता प्रदानापर्यंत **३१ डिसेंबर, २०२२ व २८ फेब्रुवारी, २०२३** पासून त्यावरील पुढील व्याजासह **३१ डिसेंबर, २०२२ व २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीप्रमाणे रु. ९,२९,०५१/- (रुपये नऊ लाख एकोणतीस हजार एकावन्न फक्त) व रु. २,०८,६६५/- (रुपये दोन लाख आठ हजार सहाशे पासष्ट फक्त)** या रकमेकरिता केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

मालमत्तेचे वर्णन

पुढील स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- मालमत्ता येथे स्थित: **फ्लॅट नं. एसी-१३, तिसरा मजला, प्लॉट नं. ४५ ते ४६, गट नं. २२, वृंदा, वन नगरी फत्तेपूर, औरंगाबाद-४३१ ००६, महाराष्ट्र, भारत.** विक्री विलेखानुसार: **पूर्व :** फ्लॅट नं. एबी-०७, **पश्चिम :** फ्लॅट नं. एसी-१४, **उत्तर :** पॅसेज, **दक्षिण :** साइड मार्जिन.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : १६.०१.२०२५

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

फॉर्म क्रमांक ३ (विनियम–१५ (१)(अ)) पहा/१६(३)

कर्जवसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळमजला, जीवन सुमन एलआयसी बिल्डिंग, प्लॉट नंबर ३, एन–५, सिडको, औरंगाबाद–४३१००३

प्रकरण क्रमांक: ओ.ए./६६५/२०२४

कायद्याच्या कलम १९ च्या उप–कलम (४) अंतर्गत समन्स, कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप–नियम (२ अ) सह वाचले.

विस्तार क्र. १२

युनियन बँक ऑफ इंडिया
विरुद्ध कृष्णा लक्ष्मणराव खोतकर

(१) **कृष्णा लक्ष्मणराव खोतकर,**
मु.पो. गाढेसावरगाव, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना, महाराष्ट्र – ४३१२०९.
(२) **जनार्धन लक्ष्मणराव खोतकर,**
मु.पो. गाढेसावरगाव, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना, महाराष्ट्र – ४३१२०९.

– समन्स –

प्रति,
ज्याअर्थी, ओ.ए.क्र./६६५/२०२४ नामदार प्रबंधक / पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१६.१२.२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ६९२५३५६.८६/–** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९ (४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स / सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्ताऐवजां प्रतींसह अर्ज). ॲक्टच्या कलम १९ च्या पोट–कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(१) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये, त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(२) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे ;
(३) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु.क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(४) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत, त्या कोणत्याही मत्तांची आणि / किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यप्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(५) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
तुम्हाला **कर्जवसुली प्राधिकरण न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी दि. २२.०१.२०२५ रोजी सकाळी १०:३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: १९/१२/२०२४ रोजी दिले.

रजिस्ट्रार,
समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी
कर्ज वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

(मराठी भाषांतर मूळ इंग्रजी मसुदा ग्राह्य)

निडो होम फायनान्स लिमिटेड

(आधी एडलविस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) नोंदणीकृत कार्यालय : टॉवर ३, ५वा मजला, विंग 'बी', कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०. प्रादेशिक कार्यालय येथे: कार्यालय क्र. ४०७-४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६

ई-लिलाव-वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली नमूद केलेल्या मालमत्तेची कर्जाच्या थकबाकीची वसुली होईपर्यंत जोडलेल्या रकान्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे रकमेच्या वसुलीसाठी **'जेथे आहे तसे, 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे'** यावर विक्री केली जाईल. कर्जदार, सहकारी कर्जदार आणि जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जासाठी सदर निर्देशित मालमत्ता **मेसर्स निडो होम फायनान्स लिमिटेड (आधी एडलविस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांच्याकडे गहाण ठेवली आहे. सुरक्षित धनकोकडे खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा भौतिक ताबा आहे.

कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	वसुलीची रक्कम	आरक्षित किंमत आणि ईएमडी	लिलावाची तारीख आणि वेळ
दिपक देविदास साबळे (कर्जदार), कोमल दिपक साबळे (सह-कर्जदार)	**रु. २६,३३,७५९/-** (रुपये सव्वीस लाख तेहतीस हजार सातशे एकोणसाठ फक्त) दि. २०.०१.२०२५ रोजीनुसार + त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च **एलएएन क्र. एलजेएएलएसटीएच००००८६७७८ यासाठी**	**रु. २६,५८,६७०/-** (रुपये सव्वीस लाख अठ्ठावन्न हजार सहाशे सत्तर फक्त) **इसारा ठेव अनामत** **रु. २,६५,८६७/-** (रुपये दोन लाख पासष्ठ हजार आठशे सदुसष्ठ फक्त)	**दि. ०७.०३.२०२५ रोजी सकाळी ११ वा. ते दुपारी १२ वाजेपर्यंत (५ मिनिटांच्या अमर्यादित ऑटो विस्तारांसह)**
तपासणीची तारीख आणि वेळ : दि. १०.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ३.०० वा. दरम्यान		**प्रतिकात्मक / रचनात्मक ताबा तारीखः- १९.१२.२०२४**	

सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :- बेअरिंग ब्लॉक क्र. १ एकूण क्षेत्रफळ मोजमापे ७६.९१ चौ. मी., खुली जागा आणि त्यावरील संपूर्ण बांधकाम, गाव मौजे सावखेडे बुधवार शिवार येथे स्थित प्लॉट क्र. १३, गट क्र. १९९/१/३ झोन क्र. ९.४, सावखेडे ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील यांचे सर्व भाग आणि पार्सल.

टीप:- १) लिलाव विक्री **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटद्वारे ऑनलाइन केली जाईल आणि वैध ईमेल, आयडी पुरावा आणि फोटो पुरावा, पॅन कार्ड धारण केलेले आणि डिमांड ड्राफ्ट/एनईएफटी/ आरटीजीएसद्वारे इसारा ठेव अनामतचे रितसर पैसे पाठवलेले बोलीदारच या 'ऑनलाइन ई-लिलाव'मध्ये भाग घेण्यास पात्र असतील.
२) इच्छूक बोलीदारांनी डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटीद्वारे त्यांचे इसारा ठेव अनामत पाठवावे :
लाभार्थीचे नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्र. ६५२२६८४५१९९ - सरफेसी- लिलाव, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३) इसारा ठेव अनामतसह ऑनलाइन अर्ज बोली अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ०६.०३.२०२५ आहे.
४) विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटला भेट द्या किंवा **श्री. मौलिक श्रीमाळी यांच्याशी फोन +९१- ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्पलाइन ई-मेल आयडी: Support@auctiontiger.net यावर संपर्क साधावा.**

मोबाइल क्र. ७४००११०३३९/९९२११४२९११
दिनांक : २१.०१.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड (आधी एडलविस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय :
पहिला मजला, आयुर मॉल, विदर्भ आयुर्वेदिक कॉलेज जवळ, दस्तुर नगर,
फार्शि स्टॉप रोड, अमरावती - 444 606

ताबा सुचना

ज्याअर्थी, युनियन बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुर्नरचना आणि प्रतिभूती अंमलबजावणी अधिनियम 2002 च्या अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (अंमलबजावणी) नियमावली 2002 (2002 चा कायदा क्र. 54) च्या नियम 3 सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) अंतर्गत दिनांक खालील नमुद आहे ला मागणी सूचना खालील उल्लेखित खात्या समोर ही सूचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना दिली होती.
कर्जदार / जमानतदार यांनी या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे एतद् व्दारा कर्जदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणा-यांनी उक्त नियमावली नियम 8 सह वाचल्या जाणा-या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13(4) च्या अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकराचा वापर करुन बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा **ताबा** बँकेने घेतला आहे.
विशेष करुन कर्जदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे **युनियन बँक ऑफ इंडिया** च्या व्याजासह प्रभाराधिन राहील.
कर्जदारास आणि जमानतदाराला अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) मधील तरतुदींमध्ये सुरक्षित कालावधीची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत आकर्षित केले आहे.

अ. क्र.	कर्जदार / जमानतदार यांचे नाव	अचल संपत्तीचे वर्णन	मागणी सुचनेची तारीख	थकबाकी रक्कम
1.	**शाखा : हिंगोली श्री. संतोष मधुकर गिरी (कर्जदार), श्री. संजय गनपतराव जाधव (जमानतदार)**	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा आणि बिल्डींग बेअरिंग सर्वे नं. 15 आणि 21 एमसी हाऊस नं. 4-2098/1 सीटीएस नं. 2749, प्लॉट नं. 25 भाग (पुर्व दिशा), रुपकेशरी नगर, ता. आणि जि. हिंगोली, महाराष्ट्र, नगर परिषद हिंगोली च्या हद्दित, श्री. संतोष मधुकर गिरी यांची, लांबी दक्षिण - उत्तरः 15.00 मी. आणि रुंदी पुर्व-पश्चिमः 6.667 मी, संपुर्ण एरिया क्षेत्रफळ 100.00 चौ. मी. चतुर्सिमाः पुर्वः प्लॉट नं. 26, पश्चिम - प्लॉट नं. 25 चा भाग, उत्तरः एस. नं. 15 आणि 21, दक्षिणः रस्ता (9 मी.)	21.10.2024 **ताब्याची तारीख** 18.01.2025	रु. 4,84,893.35 आणि त्यावरील व्याज

दिनांक : 18/01/2025
स्थळ : हिंगोली

अधिकृत अधिकारी
यूनियन बँक ऑफ इंडिया

केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, केआयएफएस कॉर्पोरेट हाऊस, हॉटेल प्लॅनेट लॅण्डमार्कच्या बाजूला, अशोक वाटिकाजवळ, बीआरटीएस, इस्कॉन-अम्ब्ली रोड, बोडकदेव, अम्ब्ली, अहमदाबाद, गुजरात-३८० ०५४.
कॉर्पोरेट कार्यालय : सी-९०२, लोटस पार्क, ग्राहम फर्थ कम्पाऊण्ड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गोरेगाव (पू), मुंबई-४०००६३, महाराष्ट्र, भारत.
फोन न. : +९१ २२ ६१७९६४००, **ई-मेल :** contact@kifshousing.com **वेबसाइट :** www.kifshousing.com
सीआयएन : U65922GJ2015PLC085079 **आरबीआय सीओआर : DOR-00145**

परिशिष्ट IV सांकेतिक ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे (केएचएफएल) प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता याखाली नमूद केलेल्या ऋणको/ हमीदारांकरिता कंपनीच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा मागणी सूचना निर्गमित केली आहे. ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको/ हमीदार तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. विशेषकरून ऋणको व आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार रकमेवरील व्याज यासह त्यात नमूद केल्यानुसार रकमेकरिता केआयएफएसच्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

अ. क्र.	ऋणको/ हमीदाराचे नाव व एनपीएची तारीख	मागणी सूचना तारीख/ थकीत रक्कम/ शाखा/ एलएएन	सुरक्षित मत्तेचे वर्णन	ताबा सूचना तारीख / प्रकार
१	**१. दीपक आत्माराम राऊत (अर्जदार) २. मंगल दीपक राऊत (सह-अर्जदार) एनपीएची : १० मे, २०२४**	**मागणी सूचना तारीख : ०४ नोव्हेंबर, २०२४** **थकीत रक्कम : रु. ९३५४९८/-** **शाखा/ एलएएन : औरंगाबाद/ 1013380/LNHLAUR002127**	प्लॉट नं. ४३, गट नं. ९०/१, खांदेश्वर गृहनिर्माण हाऊसिंग सोसायटी, सातारा परिसर मेन रोड, लॅण्डमार्क सातारा परिसर, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र, भारत. **विक्री विलेखनुसार सीमित : पूर्व :** रोड, **पश्चिम :** प्लॉट नं.२२, **उत्तर :** प्लॉट नं.४२, **दक्षिण :** प्लॉट नं. ४४. **साइटनुसार सीमित : पूर्व१ :** रोड, **पश्चिम१ :** प्लॉट नं. २२, **उत्तर१ :** प्लॉट नं. ४२, **दक्षिण१ :** प्लॉट नं. ४४.	१५ जानेवारी, २०२५ सांकेतिक

ऋणको / हमीदारांकरिता सांविधिक सूचना

ऋणको/ हमीदारांना याद्वारा सावध करण्यात येते की, मालमत्तेची विक्री जाहीर सूचना/ निविदांमार्फत यापुढे कोणत्याही वेळेत करण्यात येईल आणि सदर सूचना सिक्युरिटी (इंटरेस्ट) एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ६, ८ व ९ अंतर्गत सूचनासुद्धा समजण्यात यावी. सविस्तर वस्तुसूची व पंचनामा अडथळ्यामुळे अभिलिखित ठेवता आलेले नाहीत त्याकरिता सदर मालमत्तेचे फोटोग्राफ्स काढलेले आहेत.

दिनांक : २१.०१.२०२५
स्थळ : महाराष्ट्र

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,
केआयएफएस हाऊसिंग फायनान्स लि.

ई-लिलाव विक्री सूचना

एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन : यु६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
रिटेल सेंट्रल आणि नोंदणीकृत कार्यालय : एडलवाईस हाऊस, सीएसटी रोडच्यासमोर, कलिना, मुंबई ४०००९८

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ ('नियम') च्या नियम ८(६) ची तरतूद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे 'सरफेसी कायदा' म्हणून संदर्भित) अंतर्गत स्थावर सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

येथे नमूद केलेल्या असाइनरच्या वित्तीय सुविधा (यापुढे **('असाइनर/मूळ कर्जदार' म्हणून संदर्भित)**) प्रदान केलेल्या कॉलममध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्याच्या क्षमतेनुसार काम करत असलेल्या एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडला नियुक्त केले गेले आहेत. निर्देशित असाइनमेंटच्या अनुषंगाने, ईएआरसी यांनी असाइनरची भूमिका घेतली आणि सुरक्षित कर्जदार म्हणून आपले अधिकार वापरले. त्या ईएआरसी यांनी, एक सुरक्षित धनको म्हणून, सरफेसी कायदा आणि त्याअंतर्गत नियमांच्या कलम १३(४) अंतर्गत खाली नमूद केलेल्या स्थावर सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला होता.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनकोच्या नावे गहाण ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर सुरक्षित मालमत्ता, ज्याचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने (एओ) घेतला आहे, कर्जदार आणि जामीनदाराकडून ईएआरसी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही पैशासाठी ईएआरसी यांच्यामुळे त्यावरील पुढील व्याज आणि इतर खर्च/खर्च वजा करून खाली नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी, मालमत्ता 'जसे आहे तिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे ते' या तत्त्वावर विक्री करण्यात येईल. प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत खाली नमूद केले आहे.

लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तांचे तपशील

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक/विक्री करणाऱ्या संस्थेचे नाव	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	ट्रस्ट नाव	दि. १५.०१.२०२५ रोजीनुसार एकूण थकबाकी भारतीय रु.मध्ये	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	इसारा ठेव अनामत (ईएमडी) रु.मध्ये	लिलावाची तारीख आणि वेळ	ताबा प्रकार
१.	**एयूआरएचएल १८०००२९० आणि एयूआरएचएल १८०००२६५/ एल ॲण्ड टी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**	**१) दत्तात्रय भास्करराव वर्पे (कर्जदार) २) अनिता दत्तात्रय वर्पे (सह-कर्जदार)**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ३९६**	**रु. ४८,५५,३९१.०१**	**रु. १९,००,०००/-** (रुपये एकोणीस लाख फक्त)	**रु. १,९०,०००/-** (रुपये एक लाख नव्वद हजार फक्त)	**२५.०२.२०२५ आणि दुपारी १.३० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. डी-८, स्टिल्ट पहिल्या मजल्यावर, बिल्ट अप क्षेत्रफळ मोजमापे ४ ६.०० चौ. मी., इमारत क्र. सी मधील, 'कल्याणी शहर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात स्थित, गट क्र. एल०२/पी यावर बांधलेले, तिसगाव, औरंगाबाद - ४३१००१ ते सर्व भाग आणि पार्सल; **द्वारे चतु:सीमा: पूर्व:** फ्लॅट क्र. डी-७, **पश्चिम:** अंतर्गत प्रकल्प रस्ता, **उत्तर:** फ्लॅट क्र. डी-५ आणि प्रकल्पाचा खुला भाग, **दक्षिण:** फ्लॅट क्र. डी-५ आणि फ्लॅट क्र. डी-९.								
२.	**८१४९८७/ दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड**	**१) गणेश अप्पासाहेब शिंदे (कर्जदार) २) नंदा गणेश शिंदे (सह-कर्जदार)**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ३७१**	**रु. १७,७५,२३०.५१**	**रु. ६,१५,०००/-** (रुपये सहा लाख पंधरा हजार फक्त)	**रु. ६१,५००/-** (रुपये एकसष्ट हजार पाचशे फक्त)	**२५.०२.२०२५ आणि सकाळी ११.३० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन : मालमत्ता फ्लॅट क्रमांक जी-६, विघ्नेश्वर -बी इमारतीच्या प्रकारात मोजमापे ४७.८६ चौ. मी. क्षेत्रफळावर बांधलेले, अष्टविनायक वसाहत फेज २, गट क्र. ९९, गंगापूर-जहांगीर, तालुका आणि जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१ चे ते सर्व तुकडा आणि पार्सल आणि **द्वारे चतु:सीमा: उत्तरेकडे किंवा दिशेने -** विघ्नेश्वर - बी, फ्लॅट क्रमांक जी - ७, **दक्षिणेकडे किंवा दिशेने -** विघ्नेश्वर - बी, फ्लॅट क्रमांक जी - ५, **पूर्वेकडे किंवा दिशेने -** अंतर्गत रस्ता, **पश्चिमेकडे किंवा दिशेने -** विघ्नेश्वर - ए. फ्लॅट क्रमांक जी - ६, अधिक विशेषत: दस्तऐवज क्रमांक ३६१७/२०१२ मध्ये वर्णन केले आहे. दिनांक २६.०९.२०१२ रोजी एसआरओ, औरंगाबाद-६ येथे.								
३.	**१०४००००५४३९/पिरामल कॅपिटल ॲण्ड हाऊसिंग फायनान्स लिमिटेड पूर्वी दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे**	**१. मुकुंद अर्जुन खांडे ('कर्जदार') २. शीला मुकुंद खांडे (सह-कर्जदार)**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ४७७**	**रु. ३०,८३,४९७.१३**	**रु. १३,००,०००/-** (फक्त तेरा लाख रुपये)	**रु. १,३०,०००/-** (रुपये एक लाख तीस हजार फक्त)	**२५.०२.२०२५ आणि दुपारी ३.३० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. ०६-ब, मोजमापे ५१.२५९ चौ. मीटर, दुसऱ्या मजल्यावर, 'विजयालक्ष्मी रेसिडेन्सी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. २७ वरील बांधकाम, गट क्र. १४० वर स्थित, तिसगाव, तालुका व जिल्हा औरंगाबाद येथील आणि **द्वारे चतु:सीमा: पूर्वेकडून:** फ्लॅट क्र. ०६-ए, **पश्चिमेकडून:** आकाशाकडे मोकळे, **उत्तरेकडून:** आकाशाकडे मोकळे, **दक्षिणेद्वारे:** आकाशाकडे मोकळे.								
४.	**१०४००००७७८२/पिरामल कॅपिटल ॲण्ड हाऊसिंग फायनान्स लिमिटेड पूर्वी दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे**	**१. नागेश प्रभाकर भिंगारदेव ('कर्जदार') २. शोभा नागेश भिंगारदेव (सह-कर्जदार)**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ४७७**	**रु. ६२,८२,३३१.९७**	**रु. २०,००,०००/-** (फक्त वीस लाख रुपये)	**रु. २,००,०००/-** (दोन लाख रुपये फक्त)	**२५.०२.२०२५ आणि ०४.०० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन: फ्लॅट क्र. १०६, मोजमापे ५४.५७ चौ. मी., इतर क्षेत्रफळ ११.७० चौ. मी., तिसऱ्या मजल्यावर, 'श्री अपार्टमेंट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, जमिनीवरील प्लॉट क्र. ६ यावर बांधलेले, ग्रामपंचायत मिळकत क्र. १०८६१ असलेले, मोजमापे २८२.०१ चौ. मीटर (३०३६ चौ. फूट), गट क्र. १६, मौजे सातारा, तालुका आणि जिल्हा औरंगाबाद येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि **द्वारे चतु:सीमा: पूर्वेकडे:** फ्लॅट क्र. १०७, **पश्चिमेकडे:** आकाशाकडे उघडे, **उत्तरेकडे:** आकाशाकडे उघडे, **दक्षिणेकडे:** आकाशाकडे उघडे.								
५.	**९२८७१०/दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड**	**१) प्रकाशकुमार झनकलाल मोहेश्वर (कर्जदार) २) सरिता प्रकाश मोकेश्वर (सह-कर्जदार)**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ३७१**	**रु. १३,०८,३७४.१०**	**रु. ७,३५,०००/-** (रुपये सात लाख पस्तीस हजार फक्त)	**रु. ७३,५००/-** (रुपये त्र्याहत्तर हजार पाचशे फक्त)	**२५.०२.२०२५ आणि दुपारी १२.०० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन: फ्लॅट क्र. जी-६, मोजमापे बिल्ट अप ४५.८१ चौ.मी., इमारतीचा प्रकार गिरिजात्मक 'ब' श्री अष्टिविनायक वसाहत (टप्पा २), मोजमापे ११११९६.२३३ चौ.मी. जमिनीवर बांधलेला प्रकल्प, गट क्र. ९९, गाव गंगापूर (जहांगीर), तालुका आणि जिल्हा औरंगाबाद यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि **द्वारे चतु:सीमा: पूर्व:** अंतर्गत रस्ता **पश्चिम:** गिरिजात्मक अ फ्लॅट क्र. जी-६, **उत्तर:** गिरिजात्मक ब फ्लॅट क्र. जी-७, **दक्षिण:** गिरिजात्मक ब फ्लॅट क्र. जी-५.								
६.	**६३००००३७३०/ पिरामल कॅपिटल ॲण्ड हाऊसिंग फायनान्स लिमिटेड पूर्वी दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे**	**१. दत्तात्रय लक्ष्मणराव वाकळे ('कर्जदार') २. सत्यभामाबाई लक्ष्मणराव वाकळे ('सहकर्जदार')**	**ईएआरसी-ट्रस्ट एससी ४७७**	**रु. ४३,८५,१६८.२३**	**रु. २१,३०,०००/-** (रुपये एकवीस लाख तीस हजार फक्त)	**रु. २,१३,०००/-** (रुपये दोन लाख तेरा हजार फक्त)	**२५.०२.२०२५ आणि दुपारी ०३.०० वाजता**	**भौतिक**
मालमत्तेचे वर्णन: फ्लॅट क्र. ५०२, अ. क्र. ४७/१, सीटीएस क्र. १०१५८, श्रद्धा अपार्टमेंट, नाथ नगर, लातूर, महाराष्ट्र-४१३५१२ असलेली मालमत्ता याचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.								

लिलाव प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाची माहिती :

१	ईएमडी डिमांड ड्राफ्ट (डीडी) मुंबई येथे देय असलेल्या 'एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड - ईएमडी अकाऊंट'च्या नावे काढला जाईल.	
२	आरटीजीएस याद्वारे ईएमडी पेमेंट खालील पत्त्यावर करावे : खाते क्रमांकाचे नाव. एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड - 'ईएमडी खाते' **खाते क्रमांक :** ०००४०५१५८६०२; **बँकेचे नाव-** आयसीआयसीआय बँक; **आयएफएससी कोड :** आयएफएससी आयसीआयसी००००००४	
३	ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख	लिलावाच्या तारखेच्या १ दिवस आधी मिळाले
४	बोली सादर करण्याचे ठिकाण	१ला मजला, एडलवाईस हाऊस, सीएसटी रोडजवळ, कलिना, मुंबई-४०००९८
५	लिलावाचे ठिकाण (लिलावासाठी वेबसाइट)	**ई-लिलाव (https://auction.edelweissarc.in)**
६	संपर्क तपशील	**टोल फ्री क्रमांक : १८०० २६६ ६५४०**
७	मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	पूर्वीच्या नियुक्तीनुसार

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया ईएआरसीच्या वेबसाइटवर म्हणजेच **https://auction.edelweissarc.in** यावर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५.०१.२०२५

सही/- अधिकृत अधिकारी
एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांच्यासाठी

Edelweiss Asset Reconstruction